**मुख्य कार्यालय, विरार**

**विरार (प),**

**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**

**फॅक्स : 0250-2525107**

**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**


**जावक क्र. : व.वि.श.म./ /**

दि.२१/०९/२०२६

***वसई विरार शहर महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी***
***कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि गतिमान प्रशासन या विषयावर विशेष व्याख्यान;***
***सुप्रसिद्ध व्याख्याते व AI तज्ज्ञ चिन्मय गव्हाणकर यांचे मार्गदर्शन लाभणार***

वसई-विरार शहर महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence - AI) तसेच गतिमान आणि परिणामकारक प्रशासनाच्या विविध पैलूंची माहिती मिळावी, यासाठी महानगरपालिकेच्या वतीने '*कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि गतिमान प्रशासन'* या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. हे व्याख्यान दि. २२ सप्टेंबर २०२६ रोजी सायं.५ ते ७ या वेळेत महानगरपालिका मुख्यालयात आयोजित करण्यात आले आहे.

या विशेष व्याख्यानासाठी सुप्रसिद्ध व्याख्याते व नामवंत AI तज्ज्ञ श्री. चिन्मय गव्हाणकर उपस्थित राहून महानगरपालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. बदलत्या तंत्रज्ञानाच्या पार्श्वभूमीवर कृत्रिम बुद्धिमत्तेचा दैनंदिन कार्यालयीन कामकाजात, प्रशासकीय प्रक्रियांमध्ये तसेच नागरिकाभिमुख सेवा अधिक गतिमान, सुलभ आणि परिणामकारक करण्यासाठी कशाप्रकारे उपयोग करता येऊ शकतो, याबाबत ते मार्गदर्शन करणार आहेत.

श्री. चिन्मय गव्हाणकर यांना तंत्रज्ञान क्षेत्रातील २४ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव असून, त्यांनी Microsoft, Google, IBM, SAP, TCS आणि Tata Motors यांसारख्या नामांकित संस्थांमध्ये काम केले आहे. तंत्रज्ञानातील बदल, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि भविष्यातील संधी याबाबत ते विविध पॉडकास्ट, व्याख्याने आणि संवादमाध्यमांतून मार्गदर्शन करीत असतात. तंत्रज्ञानाकडे केवळ यांत्रिक किंवा तांत्रिक दृष्टिकोनातून न पाहता त्याला मानवी गरजा, कार्यक्षमता आणि भविष्यातील संधी यांच्याशी जोडून समजावून सांगणे, ही त्यांच्या मार्गदर्शनाची विशेषता आहे.

सध्याच्या डिजिटल युगात कृत्रिम बुद्धिमत्ता हे केवळ तंत्रज्ञान क्षेत्रापुरते मर्यादित न राहता विविध शासकीय व प्रशासकीय कामकाजातही उपयुक्त ठरत आहे. महानगरपालिकेच्या दैनंदिन कामकाजामध्ये मोठ्या प्रमाणावर माहिती, कागदपत्रे, नोंदी आणि नागरिकांशी संबंधित विविध सेवा हाताळल्या जातात. अशा परिस्थितीत आधुनिक तंत्रज्ञानाचा जबाबदारीने आणि प्रभावीपणे वापर केल्यास कामकाजातील वेळ व श्रम कमी करण्यास, प्रक्रियांमध्ये सुसूत्रता आणण्यास आणि नागरिकांना अधिक गतिमान सेवा देण्यास मदत होऊ शकते. या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेले हे विशेष व्याख्यान अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.